**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत शेततळयांची कामे ग्रामपंचायत/यंत्रणांमार्फत घेण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग (रोहयो)**
**शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१५/प्र.क्र.८५/रोहयो-१**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- १४ सप्टेंबर, २०१५**

**संदर्भ :-**

१. शासन निर्णय, नियोजन (रोहयो) विभाग, क्र. मग्रारो - २०१२ / प्र. क्र. २४ / रोहयो - १, दिनांक २१ ऑगस्ट, २०१२
२. शासन निर्णय, नियोजन (रोहयो) विभाग, क्र. मग्रारो - २०१४ / प्र. क्र. १६ / मग्रारो - १, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४.
३. शासन परिपत्रक, नियोजन (रोहयो) विभाग, क्र. मग्रारो - २०१४ / प्र. क्र. १६ / मग्रारो - १, दिनांक २१ जुलै, २०१४.
४. शासन परिपत्रक, नियोजन (रोहयो) विभाग, क्र. मग्रारो - २०१४ / प्र. क्र. ५४ / मग्रारो - १, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४.

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कृषि विभागामार्फत भूस्तराप्रमाणे शेततळे खोदण्याचा कार्यक्रम अनुज्ञेय प्रवर्गातील लाभधारक शेतकऱ्यांच्या शेतात राबविण्यास संदर्भाधीन क्र. १ येथील दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. सदर निर्णयानुसार हा कार्यक्रम ३० जून, २०१४ पर्यंत घेण्याचे निश्चित करण्यात आले होते. तसेच क्षेत्रीय स्तरावरील प्रतिसादानुसार कार्यक्रम पुढे चालू ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात येणार होता. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे यांनी त्यांच्या दिनांक ०८ जुलै, २०१४ च्या पत्रान्वये शेततळी खोदण्याच्या कार्यक्रमास मुदतवाढ देण्याची विनंती शासनाकडे केल्यानंतर, संदर्भाधीन क्र. २ येथील शासन परिपत्रक दिनांक २१ जुलै, २०१४ अन्वये शेततळे खोदण्याचा कार्यक्रम दिनांक ३१ जुलै, २०१५ पर्यंत राबविण्यास मान्यता देण्यात आली होती.

राज्यात यावर्षी देखील दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. सदर परिस्थितीत शेततळयाची कामे घेतल्यास ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना व मजुरांना रोजगार पुरविणे शक्य होणार आहे. तसेच शेततळयाच्या कामामुळे शेतकऱ्यांना संरक्षित सिंचनाची सोय भविष्यात उपलब्ध होणार आहे. तसेच छोटया आकारमानाची शेततळी घेण्याबाबत विविध निवेदने प्राप्त झालेली आहेत. सबब, शेततळयाची कामे मोठया प्रमाणात घेणे आवश्यक आहे. शेततळ्यांची कामे जलद गतीने पूर्ण होण्यासाठी छोट्या आकारामानाची शेततळी ग्रामपंचायतींमार्फत व इतर आकारमानाची शेततळी कृषि विभागासह इतर यंत्रणांमार्फत घेणे आवश्यक आहे. या संदर्भात शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेमध्ये शेततळयाची कामे ग्रामपंचायत, कृषि विभाग व इतर यंत्रणा यांचेमार्फत करण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे –

१) ग्रामपंचायतीमार्फत छोटया आकारमानाचे शेततळे (१०X१०X३ मी., १५X१०X३ मी. व १५X१५X३ मी) घेण्यात यावीत.

२) शासन निर्णय दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ अन्वये निर्धारित केलेली सर्व आकारामानाची कृषि विभागामार्फत शेततळे घेण्यात यावीत.

३) इतर यंत्रणेकडे जर तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध असेल तर त्यांचेमार्फत शासन निर्णय दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ अन्वये निर्धारित केलेली सर्व आकारमानाची शेततळे घेण्यात यावीत.

४) शासन निर्णय दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ नुसार निर्धारित केलेली आकारमाने, आर्थिक निकष व विहित कार्यपध्दती यांचे पालन करण्यात यावे.

५) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (दिनांक ६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित) मधील अनुसूची-दोन मधील परिच्छेद-४ मध्ये नमूद खालील प्रवर्गातील लाभधारक शेततळी घेण्यास पात्र असतील.

अ) अनुसूचित जाती :

आ) अनुसूचित जमाती :

इ) भटक्या जमाती (Nomadic Tribes):

ई) भटक्या विमुक्त जमाती (Denotified Tribes) :

उ) दारिद्रयरेषेखालील इतर कुटूंबे :

ऊ) महिलाप्रधान कुटूंबे :

ए) शारीरिक अपंगत्व प्रधान असलेली कुटूंबे :

ऐ) भू-सुधार योजनेचे लाभार्थी :

ओ) इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी :

औ) अनुसूचित जमातीचे व अन्य परंपरागत वन्य निवासी (वन अधिकार मान्यता) अधिनियम- २००६ नुसार पात्र व्यक्ती

अं) कृषि कर्जमाफी योजना सन २००८ नुसार अल्प भूधारक [१ हेक्टर पेक्षा जास्त पण २ हेक्टर (५ एकर) पर्यंत जमीन असलेला शेतकरी (जमीन मालक/कुळ)] **व सीमांत शेतकरी** [१ हेक्टर पर्यंत जमीन असलेला शेतकरी (जमीन मालक/कुळ)]

केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार एका ग्रामपंचायत हद्दीतील उपरोक्त प्रवर्ग अ) ते औ) मधील लाभार्थ्यांना सर्वप्रथम लाभ देण्यात यावा व त्या ग्रामपंचायत क्षेत्रातील प्रवर्ग अ) ते औ) मधील लाभार्थी संपल्यानंतर अल्पभूधारक व सिमांत शेतकऱ्यांना लाभ देण्यात यावा.

**६) लाभधारक निवड व अर्हता पध्दती :**

१.१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी वरील **अ** ते **अं** प्रवर्गातील कोणतीही व्यक्ती वैयक्तिक लाभार्थी म्हणून या योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहे.

१.२) इच्छुक लाभधारकाच्या नावे जमीन असणे आवश्यक आहे. ही जमीन कुळ कायद्याखाली येत असल्यास व ७/१२ च्या उता-यावर जर कुळाचे नाव असेल तर योजना कुळाच्या संमतीने राबविण्यात यावी. लाभार्थ्याने ७/१२ व ८-अ चे उतारे अर्जासोबत जोडावे.

१.३) इच्छुक लाभार्थ्याने ग्रामपंचायतीकडे/कृषि विभागाकडे/इतर यंत्रणाकडे अर्ज दाखल करावा.

१.४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कार्यपध्दतीप्रमाणे प्रत्येक काम घेण्यासाठी ग्रामपंचायत व ग्रामसभा यांची मान्यता आवश्यक आहे.

**७) कार्यान्वयीन यंत्रणा-**

शेतक-याची कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी शेततळयांचा कार्यक्रम महत्वपूर्ण असल्यामुळे या कार्यक्रमाची अंमलबजावणी कृषी विभागामार्फत किंवा ग्रामपंचायतीमार्फत/ इतर यंत्रणेमार्फत करण्यात यावीत. त्यांचेद्वारे कामे करतांना तात्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या संदर्भात खालीलप्रमाणे अधिकार असतील:-

| **कार्यान्वयीन यंत्रणा** | **तांत्रिक मान्यता** | **प्रशासकीय मान्यता** |
|---|---|---|
| ग्राम पंचायत | कृषी अधिकारी / कनिष्ठ अभियंता (पंचायत समिती) | गटविकास अधिकारी |
| कृषी विभाग / इतर यंत्रणा | तालुका कृषी अधिकारी | तहसिलदार |

**८) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत शेततळयाची कामे करतांना खालील गोष्टी अनिवार्य आहेत-**

१) ग्राम पंचायत / ग्रामसभा यांचा लाभार्थ्यांच्या निवडीबाबतचा ठराव व शिफारस.

२) प्रत्येक शेततळे हे स्वतंत्र काम समजण्यात यावे.

३) सर्व प्रकारच्या अकुशल कामासाठी जॉबकार्ड आवश्यक आहे.

४) ज्या लाभार्थ्याला शेततळयाचा लाभ देण्यात येणार आहे तो जॉबकार्डधारक असला पाहिजे. तसेच त्याने मजूर म्हणून काम करुन मजूरी घेणे आवश्यक आहे.

५) जॉबकार्ड धारकाच्या खात्यावर कामाची नोंद करावी.

६) दर १५ दिवसांनी मस्टरप्रमाणे मजूरी प्रदान करावी.

७) ग्रामरोजगार नोंदवहीत व ग्राम मालमत्ता नोंदवहीत सर्व प्रकारच्या नोंदी घेणे आवश्यक राहील.

८) एमआयएस वरील सर्व प्रकारच्या नोंदी घेणे आवश्यक आहे.

९) सदर कामाची सामाजिक अंकेक्षण अनिवार्य आहे त्यामुळे अकुशल व अर्धकुशल कामावरील खर्चाचे सर्व प्रमाणके/ पावत्या सामाजिक अंकेक्षणासाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहेत.

१०) मग्रारोहयोच्या मार्गदर्शक सूचना नुसार हजेरीपत्रक ठेवणे, बँक किंवा पोस्टामार्फत मजूरीचे प्रदान करणे आवश्यक आहेत.

११) शेततळयाचा आकार शेतकऱ्याकडे उपलब्ध असलेल्या क्षेत्राप्रमाणे ठरवावा.

१२) ग्रामपंचायत यंत्रणा असल्यास ग्रामपंचायत स्तरावर मजूरी साहित्याचे प्रमाण ६०:४० व कृषी विभाग/इतर यंत्रणा असल्यास जिल्हा स्तरावर मजूरी साहित्याचे प्रमाण ६०:४० ठेवण्यात यावे.

१३) ईमस्टर चा वापर करणे बंधनकारक आहे.

१४) शेततळयाची कामे हाती घेण्यापूर्वी चाचणी खड्डा घेणे आवश्यक आहे.

१५) कंत्राटदार व मजूर विस्थापित करणाऱ्या यंत्राना बंदी राहील.

१६) काम सुरु करण्यापूर्वी, प्रगतीपथावर असतांना व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो घेण्यात यावेत व सदर फोटो संकेतस्थळावर अपलोड करावीत.

१७) शेततळयाचे काही काम मजुरांकडून व काही काम इतर उपाययोजनांद्वारे करतांना मजुरांकडून इतर उपाययोजनांकडे वळतांना अशा तीनही टप्प्यांचे फोटो काढण्यात यावेत व सदर फोटो संकेतस्थळावर अपलोड करावीत.

१८) शेततळयाचे १ मी. खोदकाम हे अकुशल काम म्हणूनच करण्यात यावे.

१९) शेततळी घ्यावयाच्या ठिकाणच्या स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुसार शेततळयाची लांबी व रुंदी यामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याची मुभा देण्यात येत आहे. तथापि यामुळे शेततळयाच्या विहित आकारामानात बदल होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

२. यापुढील नवीन कामे सुरु करताना या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करावा. असे असले तरी, यापूर्वी कृषि विभागामार्फत घेण्यात आलेली शेततळयाची कामे देखील पूर्ण करण्यात यावीत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१५०९०७१३०९१८४२१६ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(आर. विमला)**
**उपसचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन**
14/9/2015

**प्रत-**

१. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई -३२
२. सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
३. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई -३२
४. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
६. मा. मुख्य सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई -३२
७. सर्व विभागीय आयुक्त
८. आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय, नागपूर
९. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई-३२ (प्रसिद्धीकरिता)
११. जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगरे वगळून) सर्व
१२. प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर
१३. संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१४. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
१५. संचालक, फलोत्पादन, पुणे
१६. संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे
१७. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय
१८. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
१९. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर

२०. सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (मुंबई व मुंबई उपनगरे वगळून) सर्व

२१. सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय

२२. सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

२३. सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

२४. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे, (स्थानिक स्तर) विभाग पुणे

२५. कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (महाऑनलाईनवर प्रसिध्दीसाठी)

२६. सारसंग्रह रोहयो – १ / निवडनस्ती (रोहयो.१)